**नि.दि.मु.क्र.२८/२००८ मधील नि.क्र.२६४, २६६ आणि २६८ खालील संयुक्त आदेश**
**(CNR-MHSN090005372008)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१४ चे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ करणेसाठी व अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून प्रतिवादी क्र.१४ चे वारस रेकॉर्डवर घेणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द अतिक्रमण काढुन कब्जा मिळणेबाबतचा व निरंतर ताकीदीचा दाखल केला आहे. वादीने त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा चौकशीसाठी नेमण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र.१४ श्रीमती भागीरथी भिमराव कदम या दि.१०.११.२०१३ रोजी मयत झाल्या आहेत. परंतु, त्याची माहिती वादी यांस मार्च २०२१ मध्ये झाली त्यानंतर वादीने लगेच मा. कोर्टास कळविले आहे. प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र. १४ हि मयत झालेचे कोर्टात कळविलेले नाही. तसेच प्रतिवादी यांना नि.२६८ अर्जामधील नमुद मुलगा असे कायदेशीर वारस आहेत. तसेच, त्या वारसांना याकामी सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१४ हे मयत झाल्यानंत त्यांचा मृत्यूचा दाखला वेळेत न मिळाल्यामुळे प्रतिवादी क्र. १४ चे वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. तसेच, यातील वादी हे कायद्याने अज्ञानी असल्यामुळे त्याना वारस रेकॉर्डवर घ्यावे लागतात याचे ज्ञान नव्हते. म्हणून वादीने वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून प्रतिवादी क्र.१४ चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विनंती केली आहे. वादी तर्फे वकील यांनी '*स्वामी प्रसाद व इतर वि. लखनसिंग व इतर २०१०(२) ऑल एम.आर १००५*' या निर्णयावर आपली भिस्त ठेवली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जांच्या पाठिमागील बाजुस आपले म्हणणे सादर केले आहे, प्रतिवादी यांच्या कथनाप्रमाणे, सदर अर्जास झालेला उशीर हा अक्षम्य दिरंगाई असल्यामुळे प्रस्तुतचे अर्ज नामंजुर करणेची तसेच, प्रस्तुत अर्ज मंजुर केलेस खर्च मिळावा हि विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिला. वादी व प्रतिवादीतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी विरुध्द अतिक्रमण काढुन कब्जा मिळणेबाबत तसेच निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. वादी यांनी प्रतिवादी नं.१४ श्रीमती.

भागीरथी भिमराव कदम या दिनांक १०.११.२०१३ रोजी मयत झालेबाबत नि.२७२ कडे मृत्यू प्रत दाखल केली आहे. नि.२७२ कडील मृत्यू दाखल्याचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१४ हे दिनांक १०.११.२०१३ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होते. सदरचा दावा वादी यांनी दिनांक ०६.०२.२००८ रोजी दाखल केलेला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १४ यांचेविरुध्द माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी दिनांक ११.०६.२००८ रोजी विना कैफियत आदेश पारित केला आहे. प्रतिवादी क्र. १४ हे दिनांक १०.११.२०१३ रोजी मयत झाल्यानंतर वादी यांनी सदरचे अर्ज दिनांक ०६.१०.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. सदरचे अर्जामध्ये वादी यांनी झालेल्या विलंबाचे कारण विस्तृतपणे दिलेले नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये कोणतेही अर्ज दाखल करणेस झालेल्या विलंबाचे कारण विस्तृतपणे करणे आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप पाहता जर प्रतिवादी क्र.१४ यांचे वारस दाव्यात सामिल न केल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच वादीच्या दाव्यात विनंती मधील पॅरा नं. ७ व नि.क्र.३८ कडील मुद्दे पाहता प्रतिवादी क्र. १४ विरुध्द वादी यांची कोणतीही दाद नसल्याचे स्पष्ट होते. वादीने सदरचा अर्ज दाखल करण्यास विलंब झाल्याचे कोणतेही समाधानकारक कारण त्यांच्या अर्जामध्ये नमुद केलेले नाही. यावरुन वादी हे कायद्याच्या तरतुदींचा गैरवापर करुन जाणीवपुर्वक विलंब करण्याच्या हेतुने अशा प्रकारचे अर्ज दाखल करीत आहेत. सबब, वादीचे अर्ज नामंजुर होणेस पात्र आहेत. सबब, या निष्कर्षास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: आदेश ::**

१. वादी यांनी दाखल केलेले निशाणी क्र.२६४, निशाणी क्र.२६६ व निशाणी क्र.२६८ कडील अर्ज नामंजुर करणेत येत आहेत.

सही/-***

**(श्रीमती जे.सी. गुप्ता)**

**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, तासगांव.**

**तासगांव.**

**दि.२०.१०.२०२१**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | D.S. Pawar |
| Court | : | 2nd Jt.Civil Judge Jr.Dn. and Judicial Magistrate F.C., Tasgaon. |
| Date | : | 20.10.2021 |
| Order signed by the Presiding officer on | : | 20.10.2021 |
| Order uploaded on | : | 20.10.2021 |